# प्रेस नोट

कोयता गॅगमध्ये सामील असणारा अल्पवयीन मुलगा हा हडपसर पोलीस स्टेशन नेमणुकीचे सपोनि लोणारे यांना मिळुन आला त्याचेकडे गुन्हेगारीकडे वळण्याचे कारणा बाबत सपोनि लोणारे यांनी विचारपुस केली त्यावेळी त्याने माझी घरची परिस्थीती हलाखीची असल्या बाबत सांगुन माझी आई मोलमजुरी करते माझ्या भावाला शिक्षणासाठी पैसे देते आईकडचे पैसे पुरत नाहीत मी आठवीतुन शाळा सोडली आहे मला शिकायच आहे असे त्यांना सांगताच लगेचच माणुसकीच्या नात्यातुन त्यास सपोनि लोणारे यांनी मी तुला पुन्हा शाळेत पाठवतो तुझा शैक्षीणीक खर्च मी करतो तु शिकणार का असे म्हणताच त्याने त्यास होकार दिला त्यानंतर दुस-या दिवशी सपोनि लोणारे यांनी त्यास पुन्हा चौकीला बोलावले तो तीन चार दिवस चौकीला येऊ लागला त्याची शिक्षणाची ओढ पाहुन सपोनि लोणारे यांनी त्यास मांजरीतील के के विदयालयात जावुन मुख्याध्यापक यांना भेटुन त्यांना सर्व वतांत सांगुन विनंती करुन प्रवेश मिळवुन देऊन त्यास शाळेत लागणारी सर्व नविन पुस्तके दप्तर इत्यादी साहीत्य ,नविन गणवेश देऊन त्याचा शिक्षणाचा खर्च उचलला आहे. त्यास शाळा सुटल्यानंतर पोलीस चौकीस रोज भेटणे बाबत सांगितले. सपोनि लोणारे यांनी एक सामाजीक बांधीलकी जपली आहे सपोनि लोणारे यांनी केलेल्या वरील कार्याबाबत त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.